क्रमांक : जिपना / शिअ / माध्य / भूअ /      / 2014
कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर
दिनांक : 8 / 9 / 2014

नागपुर म.न.पा.
शिक्षण विभाग (माध्य
आवक क्र 2278
दिनांक 11.9.14

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

शिक्षणाधिकारी (माध्य.)
नागपूर म.न.पा. नागपूर

**विषय : लोकसंख्या शिक्षण विषयक जिल्हास्तरिय भूमिका अभिनय स्पर्धा दिनांक 22 / 9 / 2014**

**संदर्भ : मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संस्था व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे पत्र क्रमांक मराशैसंप्रप / लोशिवि / 2014—2015 / 45 दिनांक 26.8.2014**

संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांसाठी भूमिका अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. भूमिका अभिनय स्पर्धेसाठी इयत्ता 9 वी मध्ये शिकत असलेले विद्यार्थी भाग घेवू शकतात. स्पर्धेसाठीचे नियम पुढील प्रमाणे आहेत.

1) स्पर्धेत कोणाच्याही धार्मिक भावनांचा अनादर होणार नाहीत याची काळजी घ्यावी.
2) इयत्ता 9 वी मध्ये शिकत असलेले विद्यार्थी सहभागी होवू शकतात.
3) एका चमुमध्ये जास्तीत जास्त 5 विद्यार्थी सहभागी होवू शकतात.
4) स्पर्धा **दि. 22 / 9 / 2014 रोजी "जि.प. पटवर्धन हायस्कूल, सिताबर्डी, नागपूर" येथे सकाळी 11.00 वाजता** आयोजित करण्यात आलेली आहे.
5) भाग घेणाऱ्या चमुसोबत एक मार्गदर्शक शिक्षक यांना पाठविण्यात यावे.
6) अभिनय स्पर्धेसाठी 5 ते 7 मिनिटाचा वेळ देण्यात येईल.
7) स्पर्धेमध्ये अंधश्रध्दा निर्मुलन, सामाजिक समस्या, स्त्रिभृणहत्या, पर्यावरण, जलसंवर्धन इत्यादीवर सादरीकरण करावयाचे आहे.

प्रति, मुख्याध्यापक
सर्व माध्य. शाळा मनपा नागपूर
सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.
दि. 12/9/2014

शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, नागपूर

Education Officer
N.M.C., Nagpur.